# ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच

(विद्युत कायदा, २००३ अंतर्गत कलम ४२ (५) अन्वये स्थापित)

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

जळगाव परिमंडळ


दुरध्वनी क्र. ०२५७ – २२७३००४

Email :-cgrfjalgaonzone@gmail.com
cejalgaon@mahadiscom.in.
cgrfjalgaon@mahadiscom.in
cejalgaonzone@gmail.com

ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच
म.रा.वि.वि.कं.मर्या.विश्रामगृहाजवळ
जुनी एम.आय.डी.सी. अजिंठा चौफुली
जळगाव –४२५ ००३


जा.क्र: स.स./ग्रागानिमं/जप/ज.मं./ जळगाव/०४–२०१५/ No 00063 दिनांक: २९/०९/२०१५

(रजिष्टर पोच व्दारे)

गाऱ्हाणे दाखल दिनांक : १०/०८/२०१५
निकाल दिनांक : २९/०९/२०१५

प्रति,

१. सौ. मुक्ता प्रकाश महाजन (मे. महाजन फूडस)
दीप व्हिला , साईनाथ सोसायटी, शास्त्री नगर,
चाळीसगाव ४२४१०१ जि. जळगाव
} तक्रारदार

२. नोडल अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वितरण. कंपनी.मर्या.
मंडळ कार्यालय,विद्युत भवन, जळगाव.

३. कार्यकारी अभियंता,
म.रा.वि.वितरण.कंपनी.मर्या.
विभागिय कार्यालय,चाळीसगाव.
} विज वितरण कंपनी

सदस्य सचिव तथा कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि.कं. मर्या.,जळगांव
ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच

## निर्णयपत्र

सौ. मुक्ता प्रकाश महाजन द्वारा प्रकाश शंकर महाजन रा .चाळीसगाव जि. जळगाव यांनी वितरण कंपनीकडे त्यांच्या चाळीसगाव एम.आय.डी.सी. क्षेत्रातील प्लॉट क्र. ब-१४ वरील महाजन फूडस या उद्योगासाठी विज पुरवठ्याकरिता नविन औद्योगिक विज जोडणीसाठी दि.०३.१२.२०१४ रोजी अर्ज सादर केला . परंतु त्यावर कार्यवाही न झाल्यामुळे ग्राहकाने अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण समितीकडे दि. २५.०४.२०१५ रोजी तक्रार दाखल केली. पण अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण समितीच्या निर्णयाने समाधान न झाल्याने आपले गाऱ्हाणे त्यांनी अनुसुची 'अ' मध्ये मंचाकडे सादर केले. ते मंचाकडे आवक क्रमांक ३८ अन्वये दि.१०.०८.२०१५ . रोजी नोंदविण्यात आले.



Scanned by CamScanner

मंचाच्या अध्यक्षांशी सल्लामसलत करून हे प्रकरण सुनावणीस घेण्याचा निर्णय घेण्यात आला. गार्हाणे अर्जाची सुनावणी वितरण कंपनीच्या चाळीसगाव विभागीय कार्यालयात दि.१६.०९.२०१५ रोजी सकाळी ११.३० वाजता निशचित करण्यात आली. या संबंधीची सुचना तक्रारदार ग्राहक व वितरण कंपनीच्या संबंधीत अधिकाऱ्यांना दि. ००.०८.२०१५. रोजीच्या पत्रान्वये देण्यात आली. याच पत्रासोबत तक्रार अर्जाची प्रत नोडल अधिकारी,जळगाव मंडल कार्यालय यांना देवुन तक्रार अर्जानुसार मुद्दे निहाय अभिप्राय १५ दिवसात मंचाकडे सादर करण्याबाबत व त्याची प्रत ग्राहकाला पोहचविण्याबाबत सुचित करण्यात आले.

सुनावणीस विद्युत वितरण कंपनी तर्फे श्री.एन.डी.नारायणे, कार्यकारी अभियंता तथा नोडल अधिकारी, जळगाव मंडल कार्यालय, श्री आर.बी. जोशी अतिरिक्त कार्यकारी अभियंता ,चाळीसगाव विभाग, श्री.एस. ए. मोरे , सहाय्यक अभियंता, चाळीसगाव ग्रामीण-२ कक्ष हे उपस्थित होते. ग्राहकाच्या वतीने त्यांचे प्रतिनिधी म्हणून पती श्री. प्रकाश शंकर महाजन व मुलगा श्री. दिपक प्रकाश महाजन हे उपस्थित होते.

**ग्राहकाची बाजुः**

१. महाजन फूड व मिनाक्षी इंडस्ट्री यांनी दि.०३.१२.२०१४ रोजी चाळीसगाव विभाग अंतर्गत प्लॉट क्र. ब–१४ व ब–२७, एम आय डी सी येथे औद्योगिक विज पुरवठ्यासाठी नविन विज जोडणी मिळणे करिता अर्ज सादर केला आहे.
२. याबाबत चाळीसगाव विभाग कार्यालयाने आज पर्यंत कोटेशन दिले नाही व ८४ दिवसानंतर पत्र क्र. ००७७१ दि. २५.०२.२०१५ नुसार मुख्य अभियंता (वाणिज्य) परिपत्रक क्र. १८२ दि. ०८.०८.२०१३ नुसार म.रा.वि.वि.क. च्या प्रचलित योजनेत सहभागी होऊन स्वखर्चाने विज वाहिनीचे काम करावे , हे उत्तर दिले आहे.
३. म.वि. नियामक आयोग प्रकरण क्र. ५६/२००७ नुसार ग्राहकाला कोटेशन नाकारणे हा ग्राहकावर अन्याय असुन म.रा.वि.वि.कं. च्या परिपत्रक क्र. २२१९७ व २५६८० चे तसेच एम.इ.आर.सी. च्या आदेशाचे उघडपणे उल्लंघन केलेले आहे. त्यामुळे ग्राहकाने पत्र दि. ०२.०३.२०१५ नुसार परिपत्रक १८२ लागू होत नसल्याचे कळविले तसेच प्रचलित योजनांची माहिती देखील मागितली.परंतु त्यास चाळीसगाव विभाग कार्यालयाने कुठलेही तोंडी व लेखी उत्तर दिले नाही. तसेच त्याबाबत अधिक्षक अभियंता तसेच मुख्य अभियंता यांचे कडे अनेक वेळा दाद मागितलेली आहे, परंतु आज पर्यंत सादर कार्यालय कडून कुठलेही उत्तर मिळाले नाही.
४. मुख्य अभियंता (वितरण) परिपत्रक क्र. २२१९७ दि. २०.०५.२००८ व क्र. २५६८० दि. १९.०६.२००८ व एम.इ.आर.सी. प्रकरण क्र. ५६/२००७ नुसार प्लॉट क्षेत्र "अ" मध्ये येतात ज्यात स्पष्ट पणे "इन्क्ल्युडिंग एम.आय.डी.सी." असे नमूद केलेले आहे, तसेच प्लॉट खडकी गावठाण व चाळीसगाव हद्दीच्या अनुक्रमे १ व २ कि.मी. परिसरात मोडतात. तसेच ११ के.व्ही. उच्च दाब वाहिनीच्या ६०० मिटर च्या आत देखील म्हणजेच क्षेत्र "ब" मध्ये देखील मोडतात.



Scanned by CamScanner

५. महावितरणच्या चाळीसगाव विभाग कार्यालयाच्या एस्टीमेट नुसार ०.२४ कि.मी. ची ११ के.व्ही. व ०.२४ कि.मी. ची लघुदाब वाहिनी तसेच एक ६३ के.व्ही. रोहित्र लागतो.

६. मुख्य अभियंता (वाणिज्य) परिपत्रक क्र. १८२ मध्ये मुख्य अभियंता (वितरण) म.रा.वि.वि.क. च्या परिपत्रक क्र. २२१९७ व २५६८० अधिग्रहित (Supersed) केले असा उल्लेख केलेला नाही. म्हणजेच परिपत्रक क्र. १८२ नुसार ग्राहकाला कोटेशन नाकारता येत नाही.

७. मुख्य अभियंता (वाणिज्य) परिपत्रक क्र. १८२ मध्ये एम.इ.आर.सी. च्या कुठल्याही आदेशाचा उल्लेख केलेला नाही. म्हणजेच सदर परिपत्रक प्रस्तावित ग्राहकास लागू होत नाही.

८. ग्राहकाच्या एम.आय.डी.सी. चाळीसगाव येथील भूखंडाचे मालकीची तारीख २००८ सालची असून एम.आय.डी.सी. चाळीसगाव २००२ पासून विकसित केलेली आहे. मुख्य अभियंता (वाणिज्य) परिपत्रक क्र. १८२ हे नवीन/भविष्यात येणाऱ्या एम.आय.डी.सी. क्षेत्रा साठी आहे त्यामुळे सदर परिपत्रक ग्राहकाला कुठल्याही बाजूने लागू होत नाही.

९. सदर परिपत्रकात स्पष्ट नमूद केले आहे की "During the meeting various aspect of synchronized efforts for Infrastructural development were discussed to create the Power infrastructure proactively in newly developing /upcoming MIDC area, following initiatives will be taken". तरी सारांश हा की सदर भुखंड मालकी हक्क २००८ रोजीचा असल्याने तसेच चाळीसगाव एम.आय.डी.सी. क्षेत्र २००२ पासुन असल्याने सदर १८२ दि.०८.०८.२०१३ लागु होत नाही.

१०. एम.आय.डी.सी. धुळे यांनी २००७ ते २००८ असे तीन वेळा महावितरण चाळीसगाव यांना एम.आय.डी.सी. चाळीसगाव येथे विजवाहिनी साठी प्रस्ताव सादर करण्याची दि. ०५/०२/२००८ च्या पत्रानुसार विनंती केलेली होती. हे पत्र महावितरण चाळीसगाव कार्यालयात क्र. ७५२ दि. ११.०२.२००८ नुसार आवक झालेले आहे. परन्तु महावितरण चाळीसगाव कार्यालयाकडून कुठलीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

११. मुख्य अभियंता (वितरण) परीपत्रक क्र. २२१९७ दि. २०.०५.२००८ व २५६८० दि. १९.०६.२००८ आणि एम.इ.आर.सी. प्र.क्र.५६/२००७ मध्ये नमूद केल्यानुसार "विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४३ खाली सार्वत्रिक विज पुरवठ्याची बांधिलकी पूर्ण करण्यासाठी तसेच एम.इ.आर.सी. प्र.क्र.५६/२००७ च्या आदेशाचे पालन करण्या साठी सदर कार्यक्षेत्रातील मुख्य अभियंता व त्यांच्या अधिपत्याखालील अभियंत्यांनी त्यांच्या क्षेत्रात होणाऱ्या विकासाचा डोळसपणे आढावा घ्यायचा आहे आणि सदर परिसरातील ग्राहकांना पायाभूत सोयी सुविधा देण्याकरिता आराखडा/योजना तयार करायच्या आहेत.

१२. परंतु महावितरण चाळीसगाव यांना विकसित होणाऱ्या एम.आय.डी.सी. क्षेत्राची पूर्ण कल्पना होती. त्यानुसार महावितरण चाळीसगाव यांनी २००८ मध्ये तयार केलेल्या पायाभूत सोयी सुविधा आराखडा क्र.१ म्हणजेच INFRA-I/DPR मध्ये सदर क्षेत्रात पायाभूत सोयी सुविधा विकसित करणे अपेक्षित होते परंतु महावितरण च्या INFRA-I/DPR मध्ये सदर ठिकाणी विज पायाभूत सुविधा साठी प्रस्ताव सादर केलेला नाही.

१३. या प्लॉट वर बांधकाम सुरु करते वेळी कमर्शियल वापरासाठी ग्राहकाने ए-१ अर्ज सादर केलेला होता. त्याची दि. २२.०५.२०१० ला पोच पावती मिळालेली आहे, परंतु बांधकाम पूर्ण होऊन देखील आजपर्यंत कनेक्शन मिळाले नाही.

१४. ग्राहकाने पत्र दि. ०३.०६.२०१५ नुसार मुख्य अभियंता (वाणिज्य) यांचेकडे म.रा.वि.वि.क. च्या परिपत्रक क्र. १८२ दि.०८.०८.२०१३ चा चुकीचा अर्थ काढून एम.आय.डी.सी. क्षेत्रातील (परिपत्रक २२१९७ नुसार क्षेत्र "अ") जुन्या भूखंड धारकांना एम.आय.डी.सी. चाळीसगाव येथे औद्योगिक वीज



Scanned by CamScanner

पुरवठा विजजोडणी न मिळणे बाबत ग्राहकाने तक्रार मांडली होती. तसेच दि.०८.०६.२०१५ रोजी समक्ष मुख्य अभियंता (वाणिज्य) यांची भेट घेऊन म.रा.वि.वि.क. च्या अधिकारी वर्गाकडून विद्युत पुरवठा नाकारण्यात येत आहे या आशयाची बाजू मांडली होती. त्यानुसार मुख्य अभियंता (वाणिज्य) यांनी पत्र क्र. २६१६३ दि. १८.०६.२०१५ नुसार कनेक्शन ताबडतोब देण्याचे आदेश संबंधीतास दिलेले आहेत. सदर आदेशाला न जुमानता म.रा.वि.वि.क. चाळीसगाव तसेच म.रा.वि.वि.क. जळगाव यांचे कडे वारंवार तक्रार करूनही येथील अधिकारी वर्गाकडून ए–१(वीज पुरवठा मागणी) अर्ज प्रलंबित ठेवलेले आहेत.

१५. तसेच मुख्य अभियंता (वितरण) यांनी देखील पत्र क्र. २१६४१ दि.०८.०५.२०१५ नुसार एम.आय.डी.सी. क्षेत्र येथे औद्योगिक वीज पुरवठा विजजोडणी करिता परिपत्रक क्र. २२१९७, २५६८० तसेच १८२ मधील तरतुदी नुसार त्वरित कार्यवाही करावी असे आदेशित केलेले आहे.

१६. ए १ (वीज पुरवठा मागणी) अर्ज प्रलंबित ठेवल्यामुळे आयजीआरसी अंतर्गत देखील तक्रार दाखल केली होती. संदर्भ क्र. २४३५ दि. ०७.०७.२०१५ नुसार सदर केसचा निकाल मिळाला. आयजीआरसी आदेशा नुसार "*सध्या आणि भविष्यात येणाऱ्या योजना मध्ये वरिल कामाची निधीची तरतूद करावी*" असे आदेशीत केलेले आहे.

१७. परंतु म.रा.वि.वि.क.चाळीसगाव यांनी पुन्हा वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशाविरुद्ध तसेच आयजीआरसीच्या आदेशा नुसार चालू INFRA- II/DPR अथवा नवीन योजने मध्ये औद्योगिक वीज पुरवठ्या साठी कोटेशन न देता संदर्भीय पत्र क्र. २२५७ दि..१५.०७.२०१५ दिले असून सदर पत्रानुसार नुसार ए १(वीज पुरवठा मागणी) अर्ज (बेकायदेशीरपणे) प्रलंबित ठेवले आहेत तसेच कार्यकारी अभियंता ,एम.आय.डी.सी., औरंगाबाद या नावाने डीडीएफ १.३ % सुपरव्हिजन चार्जेस नुसार कोटेशन देण्यात आलेले असून सदर मजुंरीत आपल्या वीज पुरवठ्यासाठी लागणाऱ्या Infrastructure ची तरतूद केलेली आहे असे परस्पर कळविले आहे.

१८. ग्राहकाचा औद्योगिक ए १ (वीज पुरवठा मागणी) अर्ज हा दि.०३.१२.२०१४ रोजीचा आहे तरी कार्यकारी अभियंता,एम.आय.डी.सी.,औरंगाबाद यांना डीडीएफ १.३ % सुपरव्हिजन चार्जेस नुसार देण्यात आलेल्या कोटेशनचा ग्राहकाच्या अर्जाशी काही एक संबंध नाही. दि. २५.०७.२०१५ रोजी म.रा.वि.वि.क. चाळीसगाव सदर अर्जाशी काही एक संबंध नसल्याचे कळविले आहे.

१९. कार्यकारी अभियंता,एम.आय.डी.सी.,औरंगाबाद यांनी त्यांच्या दोन्ही अर्जात कुठेही डीडीएफ १.३ % सुपरव्हिजन चार्जेस नुसार कोटेशन मिळावे ही मागणी केलेली नाही. तसेच नियामक आयोग आदेश क्र. ५६/२००७ नुसार ग्राहकाच्या मागणी नुसारच डीडीएफ योजनेत कोटेशन द्यावे असे आदेश आहेत. परंतु कार्यकारी अभियंता,एम.आय.डी.सी.,औरंगाबाद यांच्या संदर्भीय पत्रात कुठेही डीडीएफ योजनेत कोटेशन मिळावे असे नमूद केलेले नाही.

२०. आयजीआरसी आदेशानंतर महावितरण चाळीसगाव यांनी नवीन योजने मध्ये अथवा पायाभूत सोयी सुविधा आराखडा मध्ये कोटेशन देणे अपेक्षित होते. तसेच महत्वाची बाब ही की म.रा.वि.वि.क.चाळीसगाव यांनी ०२२५७/दि.१५.०७.२०१५ च्या त्यांच्या पत्रात संदर्भ क्र. १२२३ दि. १४.०१.२०१५ चा उल्लेख केलेला आहे त्यात मुख्य अभियंता (वितरण) यांनी "The work involve in Infra-II is basically release of all type of new connections with allied infrastructure works" असे सुस्पष्ट आदेश दिलेले आहेत.

२१. सदर बाब ग्राहकाने दि.२५.०७.२०१५ रोजी म.रा.वि.वि.क. चाळीसगाव यांना दिलेल्या पत्रात नमूद केलेली आहे. तसेच म.रा.वि.वि.क.मंडळ व परिमंडळ जळगाव यांना देखील दि.२५.०७.२०१५ च्या



Scanned by CamScanner

पत्रानुसार म.रा.वि.वि.क. चाळीसगाव यांचे पत्र क्र ०२२५७ दि. १५.०७.२०१५ अमान्य असल्याचे कळविले आहे.

२२. परिपत्रक क्र. १८२ दि.०८.०८.२०१३ चा चुकीचा अर्थ काढून एम.आय.डी.सी. भागातील जुन्या भूखंड धारकांना (ज्यांचे भूखंड दि.०८.०८.१३ पूर्वीचे आहेत) म.रा.वि.वि.क. कडून परिपत्रक क्र. २२१९७ दि.२०.०५.०८ नुसार विजजोडणीची मागणी केल्यास वीज पुरवठा नाकारता येत नाही. तसेच वीज पुरवठ्या साठी लागणाऱ्या Infrastructure ची जबाबदारी म.रा.वि.वि.क.चीच आहे. सन २००२ पासुन एम.आय.डी.सी. क्षेत्र विकसित होत असल्याचे पूर्णपणे माहित असूनही म.रा.वि.वि.क.चाळीसगाव यांनी एम.आय.डी.सी. मार्फत मिळणाऱ्या शुन्य व्याज योजना तसेच २००७-०८ च्या INFRA-I/DPR व सध्या चालू असलेल्या INFRA- II/DPR देखील एम.आय.डी.सी. क्षेत्र येथे पायाभूत सोयी सुविधा आराखडा तयार करण्यास हेतुतः दुर्लक्ष केले आहे. वारंवार वरिष्ठ कार्यालय मुख्य अभियंता (वाणिज्य) व (वितरण)) तसेच आयजीआरसी आदेशास न जुमानता ए १(वीज पुरवठा मागणी) अर्ज बेकायदेशीरपणे प्रलंबित ठेवले आहेत. तसेच दिशाभूल करणारे उत्तर दिलेले आहे. तरी सदर बाब आयजीआरसी च्या आदेशाचे उघड पणे उल्लंघन असून ग्राहकास औद्योगिक वीज पुरवठ्या पासून वंचित ठेवत आहेत.

**ग्राहकाच्या मागण्याः**

१. व्यावसायिक वापराकरिता वीज जोडणी अर्ज दि.२२.०५.२०१० रोजी अर्ज दाखल केलेला होता. तसेच दि. ०३.०१२.२०१४ रोजी औद्योगिक वापराकरिता अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जाची म.रा.वि.वि.क.तर्फे मंजुरी बाबत कुठलीही कार्यवाही केली गेलेली नाही त्यामुळे ग्राहकाला आर्थिक भुर्दंड पडला आहे. तरी विद्युत कायदा २००३ च्या कलम ४३ च्या ३ प्रमाणे तसेच आयोगाच्या नियमाप्रमाणे सदर आर्थिक नुकसानीची भरपाई म.रा.वि.वि.क.तर्फे करण्यात यावी.

२. विद्युत कायदा २००३ च्या कलम ४३ प्रमाणे ताबडतोब कनेक्शन मिळावे.

**वितरण कंपनीची बाजु :**

वितरण कंपनीचे संबंधीत नोडल अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (प्रशासन) मंडल कार्यालय जळगाव, यांनी पत्र क्र. ०३२९७ दि. १४.०९.२०१५ मंचाला सादर केले. त्याप्रमाणेः

१. श्रीमती मुक्ता प्रकाश महाजन चाळीसगाव यांना चाळीसगाव एम.आय.डी.सी मध्ये नवीन वीज पुरवठा मिळणे करीताची तक्रारीची सुनावणी अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष जळगाव येथे दि. १२.०६.२०१५ रोजी घेण्यात आली होती. त्या तक्रारीच्या अनुषगाने अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष यांनी दिलेल्या निर्णयानुसार कार्यकारी अभियंता , चाळीसगाव यांना सदर ग्राहकास सध्याच्या किंवा भविष्यात येणा-या योजनेत निधीची तरतूद करुन सदर ग्राहकास वीज पुरवठा देण्याची सुचना देण्यात आली आहे.

२. तसेच कार्यकारी अभियंता , चाळीसगाव यांनी आदेशाप्रमाणे व कार्यकारी अभियंता, मरा. औद्योगिक विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्या मागणीनुसार विद्युत खांब, रोहित्र व तारा ओढणेसाठी अंदाज़पत्रक अधिक्षक अभियंता यांचेकडे सादर केले होते. त्यानुसार अधिक्षक अभियंता यांनी अंदाजपत्रकाची १.३ % सुपरव्हिजन चार्जेस अंतर्गत मंजूर करून त्यांचा डिमांड नोट कार्यकारी अभियंता, चाळीसगाव यानी म.रा. ओद्योगिक विकास महामंडळ, औरंगाबाद यांना दिली आहे.

३. सदर रकमेचा भरणा केल्यानंतर एमआयडीसीने अंदाजपत्रकाप्रमाणे मंजुर केलेले काम केल्यानंतर व एनओसी दिल्यानंतर सदर ग्राहकास विद्युत पुरवठा तत्परतेने देण्यात येईल.


Scanned by CamScanner

मंचाचे निश्कर्ष:

१. तक्रारदार ग्राहकाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या चाळीसगाव येथील औद्योगिक क्षेत्रात २००८ साली उद्योगासाठी बी-१४ हा भूखंड घेतलेला असून वितरण कंपनीकडे प्रथम बांधकामासाठी कमर्शियल वापराकरिता नवीन वीज जोडणीचा (ए-१) अर्ज दि.२२.०५.२०१० ला सादर केला. त्यावर सुमारे ५ वर्षे वितरण कंपनीने काहीही कार्यवाही केली नाही. तसेच नंतर दि. ०३.०१२.२०१४ रोजी औद्योगिक वापराकरिता अर्ज दाखल केलेला आहे. मात्र अद्यापही त्यांना वीज पुरवठा देण्यात आलेला नाही.

२. तक्रारदाराने सादर केलेल्या कागद पत्रांवरून असे दिसते की या औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्र. बी-१४ वर २० एच.पी. नवीन वीज पुरवठ्यासाठी मागणी केली आहे. त्यांच्या व्यतिरिक्त भूखंड क्र. बी-२७ वरील आणखी एका ग्राहकाने (मे. मीनाक्षी इंडस्ट्री) दि. ०३.१२.२०१४ रोजी २० एच.पी. वीज पुरवठ्याची मागणी केली आहे. वास्तविक आतापावेतो ग्राहकांच्या मागणीच्या आधारावर आवश्यक ती अतिरिक्त सुविधा उभारुन आयोगाने विहित केलेल्या कालमर्यादेत सदर ग्राहकाना वीज पुरवठा देणे गरजेचे होते. परंतु वितरण कंपनीने आयोगाच्या विनियमांचे पालन केले नाही.

३. चाळीसगाव औद्योगिक क्षेत्रातील अस्तित्वात असलेल्या वीज वितरण सुविधेसंबंधी खालील तपशील वितरण कंपनीने सादर केला आहे:

✓ दि. २१.०५.२०१४ ला ३३/११ केव्ही एमआयडीसी चाळीसगाव उपकेंद्र उभारले व दि. १७.०६.२०१४ ला कार्यान्वित केले आहे. या उपकेंद्रात ५ एम.व्ही.ए. क्षमतेचे चे २ रोहित्र असून एकूण क्षमता १० एम.व्ही.ए. आहे. दोन इनकमर व सहा आऊट गोईंग वाहिन्या उभारल्या आहेत. मात्र, केवळ दोन आऊट गोईंग वाहिन्या ११ केव्ही जुना विमानतळ व ११ केव्ही औद्योगिक या नावाने कार्यान्वित आहेत.

✓ ११ केव्ही जुना विमानतळ या वाहिनीवर २३ डी.टी.सी. असून ५३७ ग्राहकांचा २.४५८ एम.डब्ल्यु. भार जोडलेला आहे. ११ केव्ही औद्योगिक या वाहिनीवर ४२ डी.टी.सी. असून ३३८८ ग्राहकांचा ३.२६५ एम.डब्ल्यु. भार जोडलेला आहे.

✓ एमआयडीसी चाळीसगाव उपकेंद्रात ४ वाहिन्या शिल्लक आहेत.

वरील माहितीवरून हे स्पष्ट आहे की चाळीसगाव औद्योगिक क्षेत्रातील अस्तित्वात असलेल्या वीज वितरण उपकेंद्रातून तक्रारदार ग्राहकास वीज जोडणी देणे शक्य होते.तरीही वितरण कंपनीच्या संबंधित कार्यालयाने या वस्तुस्थितीचा विचार न करता, विद्युत कायदा,२००३ आणि म.वि.नियामक आयोगाचे विनियमाचे योग्य पालन न करता व मुख्य कार्यालयाच्या सूचनांचे योग्य विश्लेषण न करता तक्रारदाराचा अर्ज हाताळला आहे.

४. विद्युत कायदा ,२००३ च्या कलम ४३ (१) व (२) नुसार असे निर्देश आहेत की:

43(1) Every distribution licensee, shall, on an application by the owner or occupier of any premises, give supply of electricity to such premises, within one month after receipt of the application requiring such supply :

Provided that where such supply requires extension of distribution mains, or commissioning of new sub-stations, the distribution licensee shall supply the electricity to such premises immediately after such extension or commissioning or within such period as may be specified by the Appropriate Commission..........."

43 (2) It shall be the duty of every distribution licensee to provide, if required, electric plant or electric line for giving electric supply to the premises specified in sub-section (1)



Scanned by CamScanner

५. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरू करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम, २०१४ च्या विनियम ४ नुसार नवीन जोडणी देण्यासाठी कार्यपद्धती व कालमर्यादा विहित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार :

- ✓ अर्ज सादर केल्याच्या तारखेपासून अर्जदाराच्या जागेची तपासणी पूर्ण करण्याचा कालावधी ग्रामीण क्षेत्रासाठी दहा दिवस आहे.
- ✓ अर्ज सादर केल्याच्या तारखेपासून अर्जदाराने करावयाच्या खर्चासंबंधी त्याला कळविण्याचा कालावधी, अस्तित्वात असलेल्या जाळ्यांमधून जोडणी द्यावयाची असेल तर ग्रामीण क्षेत्रासाठी वीस दिवस , वितरण मेन्सचा विस्तार किंवा वाढ करायची असेल तर तीस दिवस व अर्जदाराने ग्राहकाधिष्ठित वितरण सुविधा मागितल्यास तीस दिवस असा निर्धारित केला आहे.
- ✓ परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यापासून आणि आकारांचा भरणा केल्यानंतर, पुरवठा करावयाचा कालावधी, अस्तित्वात असलेल्या जाळ्यांमधून जोडणी द्यावयाची असेल तर एक महिना, वितरण मेन्सचा विस्तार किंवा वाढ करायची असेल तर तीन महिने व वितरण यंत्रणेचा भाग असलेले नवीन उपकेंद्र सुरू करावयाची गरज असल्यास एक वर्ष असा निश्चित केला आहे.
- ✓ वितरण मेन्सच्या विस्तार किंवा वाढीमध्ये, उच्च–दाब, लघु–दाब वाहिन्यांचा विस्तार आणि वितरण रोहित्र उप–केंद्राच्या क्षमता वाढीचा समावेश असतो.

६. सदर प्रकरणात नवीन उपकेंद्र सुरू करावयाची गरज नसून अस्तित्वात असलेल्या जाळ्यांमधून वितरण मेन्सच्या विस्तार करून जोडणी देणे शक्य होते. त्यामुळे अर्ज सादर केल्याच्या तारखेपासून अर्जदाराला त्याने करावयाच्या खर्चासंबंधी अंदाज (कोटेशन) वितरण कंपनीने नियामक आयोगाच्या उपरोक्त विनियमांनुसार तीस दिवसात देणे बंधनकारक होते. तसेच कोटेशन प्रमाणे आकारांचा भरणा ग्राहकाने केल्यानंतर, तीन महिन्यात वीज पुरवठा करणे आवश्यक होते.

७. वितरण कंपनीने या विहित कालमर्यादेत कोटेशन दिलेले नाही व वीज पुरवठा दिला नाही. सबब या विनियमाचे उल्लंघन केले आहे.

८. म.वि. नियामक आयोगाकडे सादर याचिका व काही ग्राहकांच्या तक्रारींमुळे महावितरणच्या मुख्य कार्यालयाच्या असे निदर्शनास आले की वितरण कंपनीचे क्षेत्रीय कर्मचारी वीज पुरवठा संहिता,२००५ विनियमच्या ३.३.३ व ३.३.४ मधील ग्राहकाधिष्ठित वितरण सुविधा (DDF) व विस्तारीकरण (Augmentation) यांचा आपल्या मनाप्रमाणे वेगवेगळा अर्थ लावतात. त्यामुळे ग्राहकामध्ये संभ्रम निर्माण होतो व त्यांना अनाठायी त्रास होतो. नवीन विद्युत जोडणी देण्यासाठी विद्युत कायदा ,२००३ च्या कलम ४६ प्रमाणे वाजवी आकारांची वसुली करण्याची प्रक्रिया सुरळीत करणे गरजेचे होते. या पार्श्वभूमीवर मुख्य अभियंता (वितरण) यांनी परिपत्रक क्र.२२१९७ दि. २०.०५.२००८ नुसार सुस्पष्ट सूचना दिल्या आहेत. त्यांचा गोषवारा खाली दिला आहे:

- ✓ क्षेत्र "ए" आणि "बी" मध्ये स्थित लघुदाब बिगर –घरगुती, लघुदाब निवासी ग्राहक, बिगर –घरगुती व निवासी संकुलातील लघुदाब बिगर –घरगुती व निवासी ग्राहक/ग्राहक समूह , जेथे विद्युत भार ५०० केव्हीए पेक्षा कमी असल्यास सर्व मुलभूत सुविधा महावितरणतर्फे निर्माण केल्या जातील व ग्राहकाकडून केवळ म.वि. नियामक आयोगाच्या आदेश दि. ८ सप्टेंबर २००६ (प्र.क्र. ७०/२००५) नुसार मंजूर आकार वसूल केला जाईल.
- ✓ क्षेत्र ए, बी व सी ची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे:
  - क्षेत्र " ए ": महानगरपालिका क्षेत्रातील ५ कि.मी. परिसर , नगर परिषद क्षेत्रातील २ कि.मी. परिसर, गावठाण हद्दीतील १ कि.मी. परिसर आणि एम.आय.डी.सी. क्षेत्र



Scanned by CamScanner

- क्षेत्र "बी": क्षेत्र " ए " च्या बाहेरील भाग जो ११/२२ केव्ही असमर्पित उच्च दाब वाहिनी (non-dedicated HT line) च्या ६०० मीटर मर्यादेत आहे.
- क्षेत्र "सी": क्षेत्र "ए"व "बी" च्या व्यतिरिक्त भाग

✓ विद्युत कायदा,२००३ च्या कलम ४३ नुसार वीज पूरवठ्याची मागणी करणाऱ्या व कलम ४६ नुसार आकार भरणाऱ्या सर्व व्यक्तींना वीज देण्याचे वितरण कंपनीवर बंधन आहे. म.वि.नियामक आयोग विद्युत पुरवठा संहिता ,२००५ व म.वि. नियामक आयोगाचा प्र.क्र. ७०/२००५ मधील आदेश दि. ८ सप्टेंबर २००६ च्या अनुषंगाने अनुसरावयाची कार्यपद्धती विहित केली आहे. मुख्य अभियंता व त्यांच्या कार्यक्षेत्रातील क्षेत्रीय अधिकारी नियमितपणे आणि स्वतःहून त्यांच्या भागात होत असलेल्या विकासाचे पुनरावलोकन करतील आणि या भागातील ग्राहकांना विद्युत जोडणी देण्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्याकरिता योजना / डीपीआर तयार करतील व आवश्यक निधी प्राप्त करून कामे व करार तयार ठेवतील. संभाव्य ग्राहकांची मागणी आल्याबरोबर योजना व कामे कार्यान्वित करून वीज जोडण्या देण्यात येतील.

✓ ज्या भागात मोठ्या प्रमाणावर जलद आणि केंद्रीभूत विकास चालू असेल त्या भागासाठी क्षेत्रीय अधिकारी स्वतः पुढाकार घेवून नवीन सबस्टेशनची निर्मिती/जुन्या सबस्टेशनमध्ये सुधारणा वगैरे सारख्या आधारभूत मुलभूत सुविधांचे निर्माण करतील, जेणेकरून नजीकच्या भविष्यातील मागणी शक्य तितक्या लवकर पूर्ण करत येईल.

मात्र या परिपत्रकाला सुमारे ७ वर्ष झाले तरी वितरण कंपनीच्या चाळीसगाव विभागीय कार्यालयाने एमआयडीसीचे बाबतीत यानुसार कारवाई केलेली नाही.

९. तक्रारदार ग्राहकाचे निवेदन व वितरण कंपनीकडून मिळालेल्या माहितीवरून असे दिसते की , वितरण कंपनीच्या संबंधित उपविभागीय कार्यालयाने मुख्य अभियंता (वितरण) परिपत्रक क्र. २२१९७ दि. २०.०५.२००८ यांच्या पत्रातील सूचनांकडे साफ दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे २००८ साली एमआयडीसी क्षेत्रात भूखंड घेतलेल्या तक्रारदार ग्राहकास व या क्षेत्रातील त्याच्यासारख्या इतर अनेक ग्राहकांवर ५ वर्षापेक्षा अधिक काळासाठी वीज पुरवठ्यापासून वंचित राहावे लागले आहे. या बाबत खालील बाबी मुख्य अभियंता ,जळगाव ,परीमंडल यांचे निदर्शनास आणण्यात येत आहेत:

✓ चाळीसगाव येथे महाराष्ट्र शासनाने औद्योगिक वसाहतीची निर्मिती केली व २००८ साली भूखंड वाटप केले . या औद्योगिक वसाहतीची महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यानी स्वतः पुढाकार घेवून विद्युत आधारभूत मुलभूत सुविधा निर्माण करायला हव्या होत्या, जेणेकरून नजीकच्या भविष्यातील मागणी शक्य तितक्या लवकर पूर्ण करत येईल.

✓ पण खेदाची बाब अशी की या संदर्भात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कार्यकारी अभियंत्यांनी त्यांचेशी २००७ सालापासून पत्र व्यवहार करून सुद्धा महावितरणने ८ वर्षे काही कारवाई केली नाही.

✓ म.औ.वि.मं.च्या औद्योगिक वसाहतींमध्ये विद्युत सुविधा निर्माण करण्याकरिता महावितरणला महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे बिन व्याजी कर्ज उपलब्ध होते. ही योजना २००७ पासून बंद करण्यात आली .तथापी म.औ.वि.मं.च्या अधिकाऱ्यानी या औद्योगिक वसाहतीस दि. ०८.१०.२००७ रोजी भेट देऊन दि. २३.११.२००७ , दि. १५.०१.२००८ व दि. ०५.०२.२००८ च्या कार्यकारी अभियंता ,चाळीसगाव यांना पत्रान्वये या वसाहतीतील विद्युत सुविधांसाठीचे अंदाज पत्रक सादर करण्याची विनंती केली होती , जेणे करून हे काम बिन व्याजी कर्ज



Scanned by CamScanner

योजने अंतर्गत घेता येईल. महावितरणच्या अधिकाऱ्यानी त्यावेळी या पत्रांना प्रतिसाद दिलेला दिसत नाही. त्यामुळे या योजनेचा लाभ महावितरणला घेता आला नाही.

✓ मुख्य अभियंता (वाणिज्य) परिपत्रक क्र. १८२ दि. ०८.०८.२०१३ नुसार म.रा.वि.वि.क. च्या प्रचलित योजनेत सहभागी होऊन स्वखर्चाने विज वाहिनीचे काम करावे असे वितरण कंपनीने तक्रारदारास सांगितले आहे. या परिपत्रकाचे अवलोकन केले असता ते नव्याने विकसित होऊ घातलेल्या औद्योगिक वसाहतीसंबंधी असून या परिपत्रकातील इतर महत्वाच्या सूचनांकडे महावितरणच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यानी दुर्लक्ष केले आहे असे दिसून येते. याच परिपत्रकात वीज हा औद्योगिक विकासात एक महत्वाचा भाग असून एकत्रित प्रयत्नांनी पुढाकार घेवून नवीन / आगामी एमआयडीसी क्षेत्रासाठी विद्युत पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर भर दिला आहे. मात्र हे परिपत्रक ऑगस्ट २०१३ साली निघाले तरी जुलै २०१५ पर्यंत वितरण कंपनीने असे काही प्रयत्न चाळीसगाव एमआयडीसी क्षेत्रासाठी केल्याचे दिसून येत नाहीत. उलटपक्षी याच पत्राच्या आधारावर तक्रारदार ग्राहकासच पायाभूत सुविधेसाठी खर्च करण्यास सांगितले आहे.

✓ आता पुन्हा कार्यकारी अभियंता , म.औ.वि.मं., औरंगाबाद यांनी पत्र दि. ३०.०१.२०१५ द्वारे ( म्हणजे सुमारे ८ वर्षांनी) कार्यकारी अभियंता , महावितरण चाळीसगाव विभाग याना व पत्र दि. ३१.०३.२०१५ अन्वये अधीक्षक अभियंता ,महावितरण ,जळगाव याना पत्र देवून उच्च दाब/लघु दाब वीज जाळ्यासंबंधी (LT/HT Network) अंदाज पत्रक सादर करण्याची विनंती केली आहे. यावर अधीक्षक अभियंता ,महावितरण ,जळगाव यांनी पत्र दि. ०४.०७.२०१५ द्वारे कार्यकारी अभियंता , महावितरण चाळीसगाव विभाग याना १.३ % सुपरव्हिजन चार्जेसचे आधारावर पोल माउंटेड डीस्ट्रीब्यूशन सबस्टेशन साठी तांत्रिक अंदाज पत्रकाची मंजुरी कळवली असून त्यानुसार महावितरणच्या चाळीसगाव ग्रामीण उपविभागीय कार्यालयाने दि. ०९.०७.२०१५ ला रु. १,८६,०३७ (१.३ % सुपरव्हिजन चार्जेस) चे कोटेशन दिले आहे. मंजूर तांत्रिक अंदाजपत्रकात एकूण रु. १,२५,४६,३३८.२० खर्च दाखवला आहे.

✓ तक्रारदार ग्राहकाने याबात वितरण कंपनीच्या मुख्य कार्यालयाशी देखील संपर्क साधला असता त्यांच्या प्रकरणात मुख्य अभियंता (वितरण) ,मुंबई यांनी अधीक्षक अभियंता ,जळगाव यांना पत्र क्र. २१६४१ दि. ०८.०५.२०१५ दिले आहे. तसेच मुख्य अभियंता (वाणिज्य) ,मुंबई यांनीही अधीक्षक अभियंता ,जळगाव यांना पत्र क्र.२६१६३ दि. १८.०६.२०१५ दिले आहे. मुख्य अभियंता (वितरण) यांच्या पत्रात मुख्य अभियंता (वितरण) परिपत्रक क्र. २२१९७ दि. २०.०५.२००८ व इतर परिपत्रकांचा संदर्भ देवून त्याप्रमाणे कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. मुख्य अभियंता (वाणिज्य) ,मुंबई यांच्या पत्रात वीज जोडणीस झालेला विलंब म्हणजे एसओपी विनियमांचे स्पष्ट उल्लंघन आहे असे नमूद करून या विलंबाबाबत खुलासा मागवला आहे. तसेच मे. मिनाक्षी इंडस्ट्री व मे. महाजन फुडस यांना त्वरेने वीजपुरवठा मंजूर करून एक आठवडयाचे आत अनुपालन अहवाल सादर करण्याचे सूचित केले आहे. या पत्रातील मजकूर खाली दिला आहेः

> " It shall be noted that release of power supply to prospective consumer within the prescribed time limits of SOP Regulation has to ensured in all circumstances In the present case there appears to clear violation, of the prescribed standard. You should therefore immediately ascertain the status of application of above mentioned consumers & also the reasons as to why the power has not yet been sanctioned/ released. If necessary accountability & responsibility should be fixed on the concern & immediately action should



Scanned by CamScanner

be taken to sanction/ release power supply to M/s. Minakshi Ind. & M/s. Mahajan Food situated at MIDC Chalisgaon .

Compliance report of the instructions as above shall be submitted within weeks time....."

अशा स्पष्ट सूचना ३ महिन्यापूर्वीच मुख्य कार्यालयाने देवून सुद्धा संबंधित कार्यालयांनी काहीच कारवाई केली नाही.

यावरून असा निश्कर्ष निघतो की महावितरणच्या चाळीसगाव विभागीय व उपविभागीय कार्यालयाने म.औ.वि.मं.च्या चाळीसगाव औद्योगिक वसाहतींमध्ये येणाऱ्या उद्योगांसाठी विद्युत सुविधांचे स्वतःहून तर काहीच नियोजन केले नाही पण म.औ.वि.मं.च्या अधिकाऱ्यानी केलेल्या पत्र व्यवहारालाही योग्य वेळी योग्य तो प्रतिसाद दिला नाही. तसेच मुख्य कार्यालयाच्या सूचनांचेही अनुपालन केले नाही.मुख्य अभियंता ,जळगाव ,परीमंडल यांनी यासंबंधी दखल घेवून संबंधीतांवर योग्य ती कारवाई करावी, असे मंच सूचित करीत आहे. तसेच यापुढे अधिक विलंब न करता चाळीसगाव एमआयडीसी क्षेत्रासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाशी समन्वय साधून च्या उच्च दाब/लघु दाब वीज जाळे उभारावे.

१०. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने सुविधा निर्माण केल्यावर तक्रारदार अर्जदारास वीज पुरवठा दिला जाईल , ही वितरण कंपनीची भूमिका चुकीची आहे. वास्तविक विद्यमांन उपकेंद्रात भार शिल्लक असून उपकेंद्र ते ग्राहकाचा भूखंड येथपर्यंत लागणाऱ्या वाहिन्या , पोल्स व रोहित्र या सुविधा हा भूखंड "ए" क्षेत्रात येत असल्याने मुख्य अभियंता (वितरण) यांच्या परिपत्रक क्र.२२१९७ दि. २०.०५.२००८ मधील सूचनानुसार वितरण कंपनीने निर्माण करून ग्राहकाकडून केवळ म.वि.नियामक आयोगाने मान्य केलेले आकार वसूल करावेत, असे मंच सूचित करीत आहे. ग्राहकाने याप्रमाणे आकार भरल्यावर लवकरात लवकर मात्र जास्तीत जास्त तीन महिन्यांच्या आत ग्राहकास वीज पुरवठा द्यावा.

११. मंचाकडे अनुसूची "अ" मध्ये गाऱ्हाणे सौ. मुक्ता प्रकाश महाजन (मे. महाजन फुड्स) यांनीच दाखल केले असून सहपत्रात याच एमआयडीसी क्षेत्रातील मे. मीनाक्षी इंडस्ट्रीच्या वीज पुरवठा मागणीचा अर्ज (ए १) जोडला आहे. मे. मिनाक्षी इंडस्ट्री व इतर ग्राहकांचे वीज मागणी अर्ज असल्यास विद्यमांन उपकेंद्रातील शिल्लक भाराच्या मर्यादेपर्यंत सौ. मुक्ता प्रकाश महाजन (मे. महाजन फुड्स) यांच्याबाबत मंचाने दिलेल्या निर्णयानुसार त्यांच्या बाबतीत देखील अशीच कारवाई वितरण कंपनीने करावी , असेही निर्देश मंच देत आहे.

१२. ग्राहकाने विद्युत पुरवठा देण्यास झालेल्या विलंबामुळे नुकसान भरपाईची मागणी केली आहे. म.वि.नि. आयोग (वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरू करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम, २०१४ च्या परिशिष्ठ अ च्या क्र. १.२ व १.३ प्रमाणे अशा विलंबासाठी भरपाई देय आहे. मात्र प्रस्तुत प्रकरणी वितरण कंपनीने ग्राहकास खर्चाचा अंदाज (कोटेशन) व विद्युत पुरवठा अद्याप दिलेला नसल्यामुळे विलंब कालावधी निश्चीत करणे शक्य नाही. त्यामुळे या कारणासाठी भरपाईची मागणी तुर्त अमान्य करण्यात येत आहे. मात्र वितरण कंपनीने याबाबत प्रत्यक्ष कार्यवाही केल्यावर विलंबावढी लक्षात घेवून तक्रारदर ग्राहक बाधित झाल्यावर ६० दिवसाचे आत अशा भरपाईची मागणी वितरण कंपनीकडे करू शकतात.

ग्राहकाचे प्रतिनिवेदन ,विद्युत वितरण कंमनीचा खुलासा व सादर करण्यात आलेली कागदपत्रे या सर्व बाबींचा विचार करून मंच या प्रकरणी खालील प्रमाणे निर्णय देत आहे.



Scanned by CamScanner

## निर्णय

१. मुख्य अभियंता (वितरण) यांच्या परिपत्रक क्र.२२१९७ दि. २०.०५.२००८ मधील सूचनानुसार चाळीसगाव एमआयडीसी क्षेत्रातील विद्यमान उपकेंद्रापासून तक्रारदार ग्राहकाच्या जागेपर्यंत आवश्यक वितरण सुविधा वितरण कंपनीने निर्माण करून ग्राहकाकडून केवळ म.वि.नियामक आयोगाने मान्य केलेले आकार वसूल करावेत व ग्राहकाने याप्रमाणे आकार भरल्यावर लवकरात लवकर मात्र जास्तीत जास्त तीन महिन्यांच्या आत ग्राहकास वीज पुरवठा द्यावा.

२. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ), विनियम २००६ मधील नियम क्र. ६.१२ नुसार नोडल अधिकारी यांनी या आदेशाच्या पूर्ततेचा व आदेशातील दखल पात्र निष्कर्ष यांवरील कारवाईचा अहवाल मंचाकडे एक महिन्याच्या आत सादर करावा.

३. निर्देशित कालावधीत वितरण कंपनीने या आदेशाची अमंलबजावणी न केल्यास म.वि.नि.आ. (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल), विनियम २००६ मधील नियम क्र. २२ अन्वये तक्रारदार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे दाद मागू शकतात.

४. या निर्णया विरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असल्यास, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल), विनियम २००६ मधील नियम क्र. १७.२ नुसार मा. विद्युत लोकपाल यांचेकडे , (व्दारा - महाराष्ट्र वीज नियामक आयोग, ६०६ "केशवा" बंगला, बांद्रा कॉम्पलेक्स (पुर्व) मुंबई- ४०००५१) येथे या आदेशाच्या दिनांकापासून ६० दिवसाच्या आत ते अपील करु शकतात.

कार्यकारी अभियंता ... .कं. ...गांव ... निवारण मंच

| सही | सही | सही |
|---|---|---|
| बिभीषण सु. निर्मळ | राजन सि. कुलकर्णी | सुरेश पां. वाघ |
| सदस्य-सचिव | सदस्य | अध्यक्ष |

**ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, जळगाव परिमंडळ**

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषितः

१. मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.(मर्या.), विद्युत भवन, परिमंडळ कार्यालय, जळगांव
२. अधिक्षक अभियंता म.रा.वि.वि.कं.(मर्या.) मंडळ कार्यालय,जळगांव

सदस्य-सचिव/कार्यकारी अभियंता
म. रा. विज वितरण कंपनी मर्यादित
ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच
जळगाव परिमंडळ, जळगांव



Scanned by CamScanner